MHNS160008792013

# <u>नियमित फौजदारी खटला क्र. ३८/२०१३ मध्ये निशाणी १३६ खाली आदेश</u>

**सरकार वि. जनार्धन जाधव**

१. सदरचा अर्ज सरकारी पक्षाने बी.एन.एस.एस. कलम ३४८ अन्वये दाखल केलेला असून त्यामध्ये सरकारी पक्षाचे कथन आहे की, त्यांनी अर्जात नमुद केलेल्या कागदपत्रांसहीत संबंधित साक्षीदारांना साक्षी समन्स काढून त्यांची साक्ष नोंदवणे गरजेचे असल्याने त्यांना साक्षी समन्स काढण्याची विनंती सदर अर्जाद्वारे सरकारी पक्षाने केलेली आहे.

२. सदर अर्जाला आरोपीच्या विधिज्ञांनी त्यांचे म्हणणे दाखल केले असून त्यांनी अर्जातील कथनांचा जोरदार विरोध केलेला आहे. आरोपीच्या विधिज्ञांनी युक्तिवाद केला की, ज्या कागदपत्रांसाठी सरकारी पक्षाने सदरचा अर्ज दिलेला आहे. ते सर्व दस्त अभिपटलावर दाखल आहेत. ते दस्त आरोपींनी मान्य देखील केलेले आहेत व त्यांना निशाणी देखील दिलेली आहे. त्यामुळे ते पुराव्यात वाचता येवू शकतात. त्यामुळे पुन्हा त्याच साक्षीदारांची साक्ष नोंदवण्याची आवश्यकता नसल्यामुळे सदरचा अर्ज नामंजूर करण्याची विनंती आरोपीच्या विधिज्ञांनी केली आहे.

३. सरकारी पक्षाचा अर्ज व त्यावरील आरोपींचे म्हणणे वाचले. दोन्ही विधिज्ञांचा युक्तिवाद ऐकला. अभिपटलाचे अवलोकन केले असता सरकारी पक्षाने ज्या कागदपत्रांसाठी सदरचा अर्ज दिलेला आहे. ती कागदपत्रे प्रस्तुतकामी अभिपटलावर दाखल केलेली आहेत व त्यांना निशाणी देखील दिल्याचे दिसून येते. त्यामुळे साहजिकच पुराव्यामध्ये ते वाचता येवू शकतात.

मात्र असे असतांनाही सरकारी पक्षाने पुन्हा हा अर्ज दिल्याचे दिसून येते. तथापि माझ्यामते सरकारी पक्षाचा सदरचा अर्ज मंजूर करुन त्यांनी अर्जात नमुद केल्याप्रमाणे साक्षी समन्स काढल्यास त्यामुळे आरोपींचे कोणतेही नुकसान होणार नाही. उलट जी सत्य परिस्थिती असेल ती समोर येणार आहे. जे सदर प्रकरणाच्या योग्य निकालासाठी सहाय्यभूतच ठरणार आहे. सबब वरील सर्व विवेचनाच्या अनुषंगाने मी पुढीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**– <u>आदेश</u> –**

१. सरकारी पक्षाचा अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. अर्जात नमुद केल्याप्रमाणे संबंधितांना साक्षी समन्स काढण्यात यावेत व त्यामध्ये अर्जात नमुद केलेली कागदपत्रे सोबत आणण्याबाबत देखील साक्षीदारांना निर्देशित करण्यात येत आहे.

३. सदरचे प्रकरण अत्यंत जुने असल्यामुळे दोन्ही विधिज्ञांना निर्देशित करण्यात येते की, त्यांनी सदरचे प्रकरण जलदगतीने चालवावे.

SUNGARE VRUSHALI DINANATH
Digitally signed by SUNGARE VRUSHALI DINANATH
Date: 2026.01.23 12:07:37 +0530

दिनांक :– २३.०१.२०२६
ठिकाण :– चांदवड

(वृषाली दी. सुंगारे)
प्रथमवर्ग न्यायादंडाधिकारी,
क.स्तर चांदवड.